शासकीय निवासी शाळा, मौजे तुळजापूर, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील नवीन इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीसीएच-२०१६/प्र.क्र.६४३/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १४ मार्च, २०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२००७/ प्र.क्र.३०/ मावक-४, दि.१७/२/२००७.
२) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/ शिक्षण/ शानिशा तुळजापूर/वाढीव सु.अं./मान्यता/का-५/१६-१७/३७४१, दि.१४/१०/२०१६.

प्रस्तावना :-

अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलामुलींसाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी शासकीय निवासीशाळा सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. दि.४/६/२००७ च्या शासन निर्णयान्वये प्रथम टप्प्यात बांधकाम करावयाच्या १०० तालुक्यांची ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मौजे तुळजापूर, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे शासकीय निवासी शाळेच्या बांधकामास रु.४,४२,११,८००/- (रुपये चार कोटी बेचाळीस लक्ष अकरा हजार आठशे फक्त) इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापी मुळ नकाशा व संकल्पनातील बदल तसेच दर सूचीत वाढ झाल्याने सदर कामाच्या मूळ किंमतीत वाढ झाली आहे. त्यामुळे आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या रु.६,२७,००,३५०/- (अक्षरी सहा कोटी सत्तावीस लक्ष तीनशे पन्नास फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी सादर केलेल्या शासकीय निवासी शाळा, मौजे तुळजापूर, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती या निवासी शाळेच्या रु.६,२७,००,३५०/- इतक्या रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार रु.६,२७,००,०००/- (रुपये सहा कोटी सत्तावीस लक्ष फक्त) इतक्या रकमेस अटींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.:-

अ) सदर बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावे.

ब) बांधकाम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा, तसेच विस्तृत नकाशास वास्तु विशारदाकंडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

क) बांधकाम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

ड) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक तयार करुनच काम हाती घ्यावे.

इ) प्रत्यक्ष बांधकाम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१ दि.१०.१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ई) सविस्तर अंदाजपत्रकात बांधकामासोबतच आवश्यक असलेल्या सोई सुविधा (गिझर, कुलर, विद्युतीकरण इत्यादी) समावेश करुनच तांत्रिक मान्यता घ्यावी.

उ) तांत्रिक मान्यता प्रदान करण्यापूर्वी अंदाजपत्रक संबंधित मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.विभाग यांच्याकडून सांक्षांकित करुन घेणे आवश्यक आहे.

२. या वर होणारा खर्च मागणी क्र.एन-४, मुख्य लेखाशीर्ष ४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च, २७७-शिक्षण, राज्य योजनांतर्गत योजना, (०१)(०४) अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलामुलींच्या शासकीय निवासी शाळांचे बांधकाम करणे (४२२५ ०५०५), ५३- मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून तो सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा. यासाठी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. प्रस्तुतचे शासन ज्ञापन वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पांच, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र.१३४, अ.क्र.१ मधील अट क्र.११ नुसार दिनांक १५/२/२०१८ रोजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

४. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०३१४१६१०५८४४२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.03.14 16:12:22 +05'30'

(अ.कों.आहिरे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अमरावती
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अमरावती.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती.
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा / लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, अमरावती
८) सहायक आयुक्त, समाजकल्याण, अमरावती.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
१०) निवडनस्ती.